# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.06.2024** **वारःमंगळवार**

1. लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीला थोड्याच वेळात सुरवात
2. मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज, सर्वत्र निकालाची उत्सुकता; शेअर बाजाराच्या निर्देशांकानं मरगळ झटकून मारली उसळी
3. 64 कोटी 20 लाख लोकांनी शांततेत मतदान करून घडवला जागतिक उच्चांक-मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांची माहिती
4. विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्याची लगबग आणि
5. कोल्हापुरात आणि समृद्धी महामार्गावर भरधाव कारच्या अपघातात सहा जणांचा मृत्यू

**<u>निवडणूक निकाल</u>**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालाकडे केवळ देशवासीयांचे नव्हे तर संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलं आहे. भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सलग तिसऱ्यांदा सत्तेत येणार की इंडि आघाडी सत्तापालट घडवून सत्तेत येणार याची उत्कंठा लागून राहिली आहे. ऐकूया याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**जगातील सर्वात मोठं लोकशाही राष्ट्र असलेल्या भारताच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांची मतमोजणी काही वेळातच सुरू होणार आहे. संपूर्ण देशात 19 एप्रिल ते एक जून 2024 अशा 7 टप्प्यांमध्ये आणि महाराष्ट्रात 19 एप्रिल ते 23 मे या कालावधीत 5 वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये पार पडलेल्या या निवडणुकांनी साऱ्या जगाचं लक्ष वेगवेगळ्या कारणांनी वेधून घेतलं. 'उत्सव लोकशाहीचा' म्हणून नावाजलेल्या या निवडणुकीसाठी 64 कोटींहून अधिक मतदारांनी आणि त्यातही 31 कोटींहून अधिक महिलांनी आपलं वय, सतावणाऱ्या व्याधी अन आजार, रणरणतं ऊन, बिकट वाटावळणं अशा अडचणींची तमा न बाळगता उत्साहानं मतदानाचा हक्क बजावला. 85 वर्षांपेक्षा जास्त वय असलेले मतदारही घरातून मतदान करत त्यामध्ये सहभागी झाले. निकोबार बेटांवरच्या काही जमातींना यावेळी पहिल्यांदा मतदान करायला मिळालं. मतदानाची टक्केवारी वाढावी आणि निवडणुकांच्या निमित्तानं होणारे गैरप्रकार रोखले जावेत यासाठी निवडणूक आयोगानं सर्व पातळ्यांवर अनेकविध प्रयत्न केले. अशी अनेक वैशिष्ट्य निर्माण केलेली ही निवडणूक मतदारांच्या आशाअपेक्षा कशा पूर्ण करणार, अठराव्या लोकसभेमध्ये कोण कोण विराजमान होणार आणि देशातील सर्वसामान्य जनतेसाठी उज्ज्वल आणि सुखकर भवितव्याच्या कोणत्या नव्या आशा पल्लवित करणार याची उत्तरं मिळवण्यासाठी आता प्रतीक्षा आहे अवघ्या काही तासांची... आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून स्वाती महाळंक.**

**<u>तयारी</u>**

सात टप्प्यात लोकसभा निवडणूकीसाठी मतदान झाल्यानंतर आता निकालाची उत्सुकता असून देशाचेच नाही तर साऱ्या जगाचे लक्ष आजच्या मतमोजणीकडे लागले आहे. मतमोजणीची सर्व प्रशासकीय तयारी पूर्ण झाली असून राज्यातल्या 48 लोकसभा मतदारसंघात आता थोड्याच वेळात म्हणजे 8 वाजता मतमोजणीला सुरवात होणार आहे. सुमारे 14 हजार 507 अधिकारी 4 हजार 309 टेबलांवर मतमोजणी करतील. सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठवण्यात आला असून कोणताही अनुचित प्रकार

होऊ नये म्हणून लक्ष ठेवण्यात येत असल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस चोक्कलिंगम यांनी सांगितलं.

सकाळी आठ वाजता सर्वप्रथम टपाली मतं मोजली जाणार असून त्यानंतर साडेआठच्या सुमारास मतदान यंत्रातील नियमित मतमोजणीला प्रारंभ होईल. दुपारपर्यंत मतमोजणी पूर्ण करण्याच्या दृष्टीनं प्रशासनाकडून नियोजन करण्यात आलं असून, पुणे जिल्ह्यातल्या चारही लोकसभा मतदार संघांचे निकाल संध्याकाळपर्यंत जाहीर होतील, असा विश्वास प्रशासनानं व्यक्त केला आहे.

**शेअर**

निवडणूक मतदानोत्तर कल चाचण्यांचा अहवाल आल्यानंतर मरगळलेल्या शेअर बाजारानं उसळी घेतली आहे. स्थानिक बाजारात उत्साहाची लाट पसरली असून निफ्टी आणि सेन्सेक्स या दोन्ही निर्देशांकात सुमारे 3 टक्क्यांची वाढ झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 2 हजार 384 अंकांनी वाढून 76 हजार 345 अंकांवर पोहोचला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी 713 अंकांनी वाढून 23 हजार 245 वर पोहोचला.

**राजीव कुमार**

या लोकसभा निवडणूकीत 64 कोटी 20 लाख लोकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून हा एक जागतिक उच्चांक असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. सर्व जी 7 देशांतल्या मतदारांपेक्षा ही संख्या दीडपट असल्याचं त्यांनी सांगितलं. काही अगदी किरकोळ प्रकार वगळता, कोणतीही अनुचित घटना नं होता ही निवडणूक पार पडली, हे या निवडणूकीचं वैशिष्ट्य आहे. त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्थेमुळे निवडणूक शांततेत पार पडली असून आज होणारी मतमोजणीही सुरळीतपणे पार पडेल, असा विश्वास; राजीवकुमार यांनी व्यक्त केला. सर्व मोजणी केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे सतत सुरू असतील, आणि मोजणीच्या प्रक्रियेविषयी कोणीही शंका बाळगू नये, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**पदवीधर मतदार संघ**

राज्य विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या तीन जागांसाठी भाजपाने आपले उमेदवार जाहीर केले आहेत. कोकण मतदारसंघासाठी निरंजन डावखरे यांना भाजपानं पुन्हा उमेदवारी दिली असून मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी किरण शेलार आणि मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी शिवनाथ दराडे ह्या नव्या चेहऱ्यांना पक्षानं संधी दिली आहे.

मनसेनं कोकण मतदारसंघासाठी अभिजीत पानसे यांना उमेदवारी दिली आहे, तर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेनं मुंबई मतदारसंघासाठी अनिल परब तर मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी ज मो अभ्यंकर यांना उमेदवारी दिली आहे. कोकण पदवीधर मतदार संघासाठी काँग्रेसचे उमेदवार रमेश किर यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

नाशिक शिक्षक मतदार संघासाठी प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांनी काल आपला अर्ज दाखल केला. तर नाशिकमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेनं ॲडव्होकेट संदीप गुळवे यांना उमेदवारी दिली आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख 7 जून आहे. मतदान 26 जून रोजी होणार असून 1 जुलै रोजी निकाल लागतील.

**कार्य शाळा**

मुंबई मंत्रालयातल्या वार्ताहर कक्षात 'माध्यम साक्षरता अभियान' अंतर्गत 'ओळख विधिमंडळ कामकाजाची' या विषयावर एक दिवसाच्या कार्यशाळेचं आयोजन काल करण्यात आलं. मंत्रालयातलं माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघानं संयुक्तपणे या कार्यशाळेचं आयोजन केलं होतं. विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे तसंच विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं.

**बियाणे**

नांदेड जिल्ह्यात रविवारी संध्याकाळी पडलेल्या जोरदार पावसानंतर शेतकऱ्यांची बी बियाणे खरेदी करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. मात्र, शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये आणि चांगला पाऊस झाल्यानंतरच कृषी विभागाच्या सल्ल्यानंतरच पेरणी करावी, असं आवाहन करण्यात येत आहे.

**कृषिसेवा केंद्र**

धाराशिव जिल्ह्यात कृषि विभागाकडून नियमितपणे कृषि सेवा केंद्रांची तपासणी करण्यात येत असून, अनियमितता आढळून आलेली दोन कृषि सेवा केंद्र कायमस्वरूपी रद्द करण्यात आली. तसंच 12 कृषि सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून पाच केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

**विक्रेत्यांवर लक्ष**

पुणे जिल्ह्यातले काही विक्रेते खतं आणि बियाणांची जास्त दरानं विक्री करण्याच्या उद्देशानं जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण करतात. अशा विक्रेत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी पुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीनं 14 भरारी पथकं स्थापन करण्यात आली आहेत. खतांची चढया दरानं विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

**गांजा**

पुणे सीमा शुल्क विभागानं 884 किलो गांजा एका ट्रकमधून जप्त केला आहे. हा गांजा ओडिशामधून आणण्यात आला होता आणि तो सोलापूरला घेऊन जाण्यात येत होता. याची किंमत 2 कोटी 20 लाख रुपये असून, या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

**अपघात-कोल्हापूर**

कोल्हापूरमध्ये काल दुपारी कार चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे झालेल्या अपघातात शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू वसंत चव्हाण यांच्यासह तीन जणांचा मृत्यू झाला. चव्हाण हे कार चालवत असताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानं त्यांचं कार चालनावरील नियंत्रण सुटून भरधाव कारनं तीन दुचाकींना धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील चार जण जखमी झाले असून जखमींपैकी एक जण गंभीर आहे.

**अपघात-वाशिम**

समृद्धी महामार्गावर वाशिम भागात रविवारी भरधाव कारनं ट्रकच्या मागच्या बाजूला धडक दिल्यानं झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. अपघातग्रस्त कार ही अमरावती जिल्ह्यातली असण्याची शक्यता असून मृतांची ओळख अद्याप पटली नाही.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरू असून येत्या चार ते पाच दिवसांत तो मध्य अरबी समुद्रासह महाराष्ट्राच्या दक्षिण भागात दाखल होण्यास अनुकूल वातावरण आहे. राज्यात कालही तुरळक ठिकाणी मॉन्सूनपूर्व पावसाच्या हलक्या सरी पडल्या. विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात उष्ण हवामान असून सर्वाधिक कमाल तापमान यवतमाळ इथं 45 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. राज्याच्या बहुतांश भागात आजही तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार